# उल्हासनगर महानगरपालिका

पर्यावरण विभाग
दिनांक 26/08/2022

## आवाहन

शासनाच्या पर्यावरण विभागाकडील दिनांक 3 मे 2011 रोजीच्या शासन निर्णयान्वये सणांचे पर्यावरणपुरक साजरीकरणासाठी व पर्यावरणाची हानी टाळण्यासाठी खालीलप्रमाणे दिलेल्या मार्गदर्शक सुचनांचे पालन करणेबाबत उल्हासनगर शहरातील नागरीक / उत्सव मंडळ यांना याद्वारे आवाहन करण्यात येत आहे.

1) केद्रीय प्रदुषण नियंत्रण मंडळ यांनी मुर्ती विसर्जनाबाबत मार्गदर्शक सुचना निर्गमित केल्या असुन दिनांक 12/05/2020 रोजी प्रकाशित केल्या आहेत त्यानुसार पि.ओ.पि. मुर्ती उत्पादनावर बंदी घालण्यात आलेली आहे. सदर मार्गदर्शक सुचनांची अंमलबजावणी दि. 01/01/2021 रोजी पासुन बंधनकारक केली आहे.
2) सदर मार्गदर्शक सुचनांची अमलबजावणी त्वरीत करणे व मुर्ती उत्पादक, कारागीर, सार्वजनीक गणेश उत्सव मंडळ व इतर सर्व संबंधितांमध्ये तसेच विसर्जन हौदामध्ये / घरगुती श्री गणेश मुर्ती विसर्जन याबाबत जागरुकता निर्माण करणेसाठी केद्रीय प्रदुषण नियंत्रण मंडळाने प्रकाषित केलेल्या मार्गदर्शक सुचना सुलभ संदर्भासाठी उल्हासनगर महापालिकेने http://www.Umc.Gov.in या संकेतस्थळावर पाहण्यासाठी उपलब्ध आहे.
3) उल्हासनगर महानगरपालिकेतर्फे मुर्ती विसर्जनासाठी खालिल ठिकाणी कृत्रीम तलाव / हौद तयार करण्यात आले आहेत.
   1) सेंच्युरी क्लब समोर, शहाड उल्हासनगर -1
   2) आय डी आय कंपनीच्या पुढे शहाड उल्हासनगर-1
   3) बोटक्लब, हिराघाट, उल्हासनगर-3
   4) FOB च्या बाजुला, उल्हासनगर रेल्वे स्टेशन बाहेर, उल्हासनगर-3
   5) कैलास कॅालनी, उल्हासनगर-5
4) शाडु वा मातीपासुन तसेच कागदी लगद्यापासुन बनविलेल्या पर्यावरणपुरक रंगाच्या मुर्तींना तसेच लहान आकाराच्या मुर्तींना प्राधान्य द्यावे.
5) दिनांक 1 जुलै 2022 पासुन बंदी असलेल्या प्लास्टीक पिशव्या व इतर प्लास्टीक वस्तुंचा वापर करण्यात येवू नये.
6) सार्व. उत्सव मंडळांनी मंडपाच्या ठिकाणी ओला कचरा व सुका कचरा यासाठी स्वतंत्र कचरा कुंड्या ठेवाव्यात. तसेच स्वतंत्र निर्माल्य कलश ठेवावे.
7) मंडळांनी ध्वनीक्षेपकाचा वापर करीत असताना ध्वनीप्रदुषण (नियमन व नियंत्रण) नियम 2000 सुधारणांसह मधील ध्वनीच्या पातळीचे नियंत्रण ठेवावे.
8) मुर्तीच्या आरासीच्या वेळी थर्माकोल व इतर पर्यावरणास हानीकारक वस्तुंचा अनावश्यक वापर करु नये. तसेच नैसर्गिक अशा विविध रंगाच्या फुलांच्या आरासीस अधिकाधीक प्राधान्य द्यावे.
9) घरकुलात / संस्थेत / निवासी संकुलात एक घरकुल एक गणपती अशी संकल्पना राबवावी.
10) घरगुती मुर्तीचे विसर्जन हे महापालिकेने उपलब्ध करुन दिलेल्या कृत्रिम तलावात करावे व निर्माल्याची विल्हेवाट निर्माल्य कलशाद्वारे लावण्यात यावी.
11) मुर्तीची प्रतिष्ठापना व विसर्जन करताना मिरवणुकीत ध्वनीची पातळी मानकाप्रमाणे नियंत्रित ठेवावी ध्वनी प्रदुषण टाळावे.
12) उल्हासनगर शहरात हवा, वायु, तसेच ध्वनी प्रदुषण होत असल्याची बाब आढळुन आल्यास त्यांना टोल फ्री 18002331103 या क्रमांकावर प्रदुषणा संदर्भात तक्रार नोंदविता येईल.

(अजीज शेख)
प्रशासक तथा आयुक्त
उल्हासनगर महानगरपालिका